नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३५४ | Issue - 354 | वार रविवार दि. १७ मे २०२६ | Blow- Sunday Date 17 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## सध्याचे दशक अनिश्चितता, जागतिक संकटाचे : पीएम मोदी

### भारत हा तांत्रिक प्रगती आणि मानवी मूल्यांच्या बळावर पुढे जाणारा एक संधींचा देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नेदरलँड : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी आपल्या नेदरलँड्स दौऱ्यादरम्यान द हेग येथे भारतीय समुदायाला संबोधित केले. यावेळी त्यांनी भारताचे झपाट्याने होणारे तांत्रिक परिवर्तन, लोकशाही की लवचिकता आणि वाढता जागतिक प्रभाव यावर विशेष भर दिला. त्याचबरोबर सध्याचे दशक अनिश्चितता आणि जागतिक संकटाचे राहिले आहे. त्यांनी कोविड-१९ महामारी आणि सध्या सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय युद्धांचा जगासमोरील मोठी आव्हाने म्हणून उल्लेख केला. हे दशक जगासाठी आव्हानांचे दशक बनत चालले आहे, असे ते म्हणाले. त्याचवेळी, पंतप्रधानांनी ठामपणे सांगितले की, भारत हा तांत्रिक प्रगती आणि मानवी मूल्यांच्या बळावर पुढे जाणारा एक संधींचा देश आहे. मोदी म्हणाले, भारत हा संधींचा देश आहे. भारत तंत्रज्ञानाने प्रेरित आहे आणि तितकाच तो मानवतेने प्रेरित देखील आहे. आजचा भारत एका अभूतपूर्व परिवर्तनाच्या काळातून जात आहे. भारतात आकांक्षा अमर्याद आहेत, म्हणूनच आमचे प्रयत्न देखील अथांग होत आहेत.

भारताच्या लोकशाही रचनेचा उल्लेख करताना मोदी म्हणाले, भारत आपल्या प्रत्येक नागरिकाच्या लोकशाहीतील सहभागाला अत्यंत मोलाचे मानतो. लोकशाहीची जननी म्हणून हे आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. भारत आणि नेदरलँड्स हे दोन्ही देश विश्वासार्ह आणि पारदर्शक जागतिक पुरवठा साखळी तयार करण्यासाठी एकत्र काम करत आहेत. तंत्रज्ञान, व्यापार यांपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील धोरणात्मक प्रकल्पांपर्यंतच्या क्षेत्रांमध्ये दोन्ही देश सहकार्य अधिक दृढ करू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**भारतात स्टार्टअपचे मोठे नेटवर्क**

**भारतातील स्टार्टअप्सच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले की, भारताचे स्टार्टअप नेटवर्क जगात तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे नेटवर्क बनले आहे. भारत स्टार्टअप्स एआय , संरक्षण आणि अंतराळ क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत, असे सांगून त्यांनी स्पष्ट केले की भारताची ही नाविन्यपूर्ण अर्थव्यवस्था जागतिक सहकार्यासाठी नवीन संधी निर्माण करत आहे.**



अनिवासी भारतीयांच्या एका मोठ्या मेळाव्याला संबोधित करताना, पंतप्रधान मोदींनी भारतीय समुदायाचे कौतुक केले. ते म्हणाले की, या समुदायाने भारताशी असलेले आपले मजबूत सांस्कृतिक संबंध जपले आहेत. आपल्या कर्तृत्वाने व व्यावसायिक यशामुळे परदेशात भारताची प्रतिमा उंचावली आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, द हेगमधील भारतीय समुदायाशी संवाद साधताना अत्यंत आनंद झाला. त्यांची आपुलकी, यश आणि भारतासोबत असलेले घट्ट नाते आपल्या सर्वांसाठी सतत अभिमानास्पद ठरत आहे.

भारतीय संस्कृतीच्या शाश्वत स्वरूपावर भर देताना मोदी म्हणाले की, शतकानुशतके जागतिक बदल होऊनभी भारताची सांस्कृतिक ओळख नेहमीच जिवंत राहिली आहे. ते म्हणाले, काळाच्या ओघात अनेक संस्कृती नष्ट झाल्या. परंतु, भारताची वैविध्यपूर्ण संस्कृती आजही इथल्या लोकांच्या हृदयात तितक्याच ताकदीने धडधडत आहे. भारताच्या आर्थिक आणि तांत्रिक प्रगतीवर प्रकाश टाकताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, देश सेमीकंडक्टर निर्मिती आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी प्रगती करत आहे. भारतभरात सध्या १२ सेमीकंडक्टर प्लांट्सवर काम वेगाने सुरू असून, दोन प्लांटमध्ये उत्पादन देखील सुरू झाले आहे, अशी माहिती त्यांनी दिली. मोदी म्हणाले, याचा अर्थ असा की आता चिप्स भारतात 'डिझाइन'ही केल्या जातील आणि 'मेड इन इंडिया' देखील असतील.

**नेदरलँड महत्त्वाचा आर्थिक भागीदार**

भारत तंत्रज्ञान, व्यापार, हवामान सहकार्य, सेमीकंडक्टर आणि धोरणात्मक पुरवठा साखळी यांसारख्या क्षेत्रांमध्ये नेदरलँड्ससह युरोपीय देशांसोबतचे संबंध मजबूत करत असतानाच पंतप्रधानांचे हे वक्तव्य आले आहे. युरोपीय युनियनमध्ये नेदरलँड्स हा भारताचा एक महत्त्वाचा आर्थिक भागीदार म्हणून समोर आला आहे. नेदरलँड्समधील भारतीय समुदायाची लोकसंख्या २ लाखांपेक्षा जास्त असून, या समुदायाने दोन्ही देशांमधील सांस्कृतिक आणि आर्थिक संबंध वाढवण्यात मोठी भूमिका बजावली आहे.

## वेळेआधीच मान्सून अंदमानात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. यंदा 'अल निनो'चे सावट जुगारून नैऋत्य मोसमी वारे (मान्सून) नियोजित वेळेच्या ४ दिवस आधीच अंदमान आणि निकोबार बेटांवर दाखल झाले आहेत, अशी अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाने केली आहे. भारतीय समुद्री स्थिरांक सकारात्मक असल्यामुळे मान्सूनचा प्रवास प्रचंड वेगाने सुरू झाला आहे. दरवर्षी साधारण २० मेच्या आसपास अंदमानात पोहोचणारा मान्सून यंदा १६ मे रोजीच दाखल झाला आहे. मान्सूनने निकोबार बेटे पूर्णपणे व्यापली असून अंदमान बेटांचा काही भाग, अंदमान समुद्र, बंगालच्या उपसागराचा दक्षिण भाग आणि अरबी समुद्राच्या आग्नेय भागात प्रगती केली आहे. अंदमानातील वेळेआधीच्या आगमनामुळे यंदा केरळ आणि महाराष्ट्रातही मान्सून वेळेपूर्वीच धडकण्याची शक्यता आहे. सामान्यतः १ जून रोजी पोहोचणारा मान्सून यंदा २६ मेच्या आसपास केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. ५ जूनपर्यंत मान्सून गोव्यात दाखल होण्याची शक्यता आहे. तर ६ जूनपर्यंत मान्सून कोकणात पोहोचेल. ७ जूनपर्यंत पुण्यात मान्सूनचे आगमन होण्याचा अंदाज आहे. तसेच राज्याच्या इतर भागांत नियोजित वेळेच्या ३ ते ४ दिवस आधी म्हणजेच २ ते ५ जून दरम्यान मान्सून दाखल होऊ शकतो. प्रवासाचा वेग जास्त : हवामान खात्याच्या माहितीनुसार, सध्या अंदमान परिसरात ताशी ३५ ते ४५ किलोमीटर वेगाने पश्चिमेकडील वारे सक्रिय झाले आहेत. पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सून आणखी पुढे सरकण्यासाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक वातावरण आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे.

**महाराष्ट्रात २ ते ५ जून दरम्यान पावसाच्या आगमनाचा अंदाज**

विशेष म्हणजे, यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसून तो सुरळीत पुढे सरकणार आहे. यामुळे यंदा भरपूर पाऊस पडेल, अशी आशा पल्लवीत झाली आहे. मध्य भारतात उष्णतेची लाट : महाराष्ट्रात पावसाची शक्यता: मान्सून पुढे सरकत असतानाच, महाराष्ट्रात उद्यापासून म्हणजेच १७ मेपासून दक्षिण कडील जिल्हे, मराठवाड्याचा काही भाग आणि किनारी प्रदेशात सोसाट्याचा वारा, विजा आणि ढगांच्या गडगडाटासह अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ईशान्य भारतात मुसळधार : पुढील ४ ते ५ दिवस ईशान्य भारत आणि दक्षिण भारतातील तामिळनाडू, केरळ, पुद्दुचेरी आणि दक्षिण कर्नाटकात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मान्सूनचा प्रवास सुरू झाला असला, तरी उत्तर-पश्चिम, पश्चिम आणि मध्य भारतासह महाराष्ट्राच्या अंतर्गत भागांत पुढील काही दिवस उष्णतेची तीव्र लाट आणि उकाडा कायम राहील.

## नीट २०२६ पेपरफुटी प्रकरण; एनटीएच्या बायोलॉजीच्या प्राध्यापिकेला पुण्यातून अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'नीट-युजी' परीक्षेत झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. या पेपरफुटी प्रकरणात आता सीबीआयने अत्यंत महत्त्वाची कारवाई करत शनिवारी एका बायोलॉजीच्या (जीवशास्त्र) प्राध्यापिकेला बेड्या ठोकल्या आहेत. नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (छढ) प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या अत्यंत गोपनीय समितीत या प्राध्यापिकेचा समावेश होता. गेल्या ३ मे रोजी ही वादग्रस्त परीक्षा पार पडली होती. या महाघोटाळ्याचा मुख्य सूत्रधार मानला जाणारा प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी आणि इतर काही आरोपींची सीबीआयने कसून चौकशी केली होती. या सखोल चौकशीतून मिळालेल्या महत्त्वपूर्ण माहितीच्या आधारेच तपास यंत्रणेने या प्राध्यापिकेच्या मुसक्या आवळल्या आहेत.

मनीषा मांढरे असे या अटक करण्यात आलेल्या प्राध्यापिकेचे नाव आहे. दिल्लीतील सीबीआय मुख्यालयात तिची प्रदीर्घ काळ चौकशी करण्यात आली आणि त्यानंतर तिला अधिकृतरीत्या अटक करण्यात आली. एनटीएने तिची 'विषय तज्ज्ञ' म्हणून नियुक्ती केली होती आणि वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेत तिचा थेट व महत्त्वाचा सहभाग होता, अशी धक्कादायक माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. 'बॉटनी' (वनस्पतीशास्त्र) आणि 'झुऑलॉजी' (प्राणीशास्त्र) या विषयांच्या प्रश्नपत्रिका हाताळण्याचे संपूर्ण अधिकार मनीषा मांढरेकडे होते. या अधिकारांचा तिने गैरफायदा घेतला. १४ मे रोजी अटक करण्यात आलेली दुसरी आरोपी मनीषा वाघमारे हिच्या मध्यस्थीने मांढरेने एप्रिल २०२६ मध्ये काही विद्यार्थ्यांशी संधान बांधले. त्यानंतर या निवडक विद्यार्थ्यांसाठी पुण्यात स्वतःच्या घरी 'खासगी शिकवणी' सुरू केली.

## महावितरणचे अखेर विभाजन; कृषी वीजपुरवठा स्वतंत्र पद्धतीने हाताळण्यासाठी निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या महावितरणच्या विभाजनावर अखेर शिक्कामोर्तब झाले असून, राज्यातील कृषी वीजपुरवठा स्वतंत्र पद्धतीने हाताळण्यासाठी महावितरणचे दोन तुकडे करण्यात आले आहेत. या संदर्भातील 'महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची पुनर्रचना आणि हस्तांतरण योजना, २०२६' अधिसूचना सरकारने राजपत्रात प्रसिद्ध केली आहे. या निर्णयानुसार, राज्यातील शेतकऱ्यांच्या वीज पुरवठ्याचा संपूर्ण कारभार आता 'एमएसईबी सोलर ग्रो पॉवर लिमिटेड' या नव्या स्वतंत्र संस्थेकडे सोपवण्यात आला असून ही व्यवस्था १ एप्रिल २०२६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू मानली जाणार आहे.

राज्य सरकारने महावितरणचा कृषी वीजपुरवठा विभाग पूर्णपणे वेगळा केला आहे. नव्याने स्थापन झालेली 'महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (एमएसईबी) सोलर ग्रो पॉवर लिमिटेड' ही कंपनी आता कृषी ग्राहकांसाठी स्वतंत्र 'वीज वितरण परवानाधारक' म्हणून काम करेल. ही कंपनी एमएसईबी होल्डिंग कंपनीची पूर्ण मालकीची उपकंपनी असणार आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रात आता शेतकऱ्यांसाठी देशातील पहिली स्वतंत्र वीज कंपनी अस्तित्वात आली आहे.शेतकऱ्यांशी संबंधित सर्व आर्थिक आणि प्रशासकीय व्यवहार आता या नव्या कंपनीच्या अखत्यारीत येतील. यामध्ये कृषी ग्राहकांची नवीन नोंदणी आणि नवीन वीज जोडण्या देणे, शेतकऱ्यांचे वीजबिल तयार करणे आणि वीजबिल वसुली करणे, ग्राहक सेवा, नियामक अर्ज आणि लेखांकन सांभाळणे, सरकारकडून मिळणारे कृषी अनुदान आणि सबसिडीचे व्यवस्थापन करणे, आदी कामांचा समावेश आहे. या विभाजनात एक मोठी तांत्रिक मेख आहे. वीजवाहिन्या, ट्रान्सफॉर्मर, उपकेंद्रे, वितरण यंत्रणा आणि इतर सर्व पायाभूत सुविधा महावितरणकडेच सुरक्षित राहतील. औद्योगिक, व्यावसायिक, निवासी आणि बिगर कृषी ग्राहकांना नेहमीप्रमाणे महावितरणच वीजपुरवठा करेल. नवी कृषी कंपनी ही केवळ 'किरकोळ वीजपुरवठादार' म्हणून काम करेल. महावितरण या नव्या कंपनीला वीज वितरणासाठी आपल्या पायाभूत सुविधा पुरवणार असून, त्या बदल्यात महावितरणला सेवा शुल्क दिले जाईल. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २०२६ ते २०३० या कालावधीसाठी वार्षिक अंदाजे १ हजार ५०० कोटी रुपयांच्या सेवा शुल्काची तरतूद केली आहे. कृषी ग्राहकांकडील जुनी अब्जावधी रुपयांची थकबाकी आणि सरकारकडून येणारे कृषी अनुदान आता नव्या संस्थेकडे हस्तांतरित केले जाईल. या नव्या कृषी संस्थेचा गाडा सुरुवातीला सुरळीत चालावा आणि खेळते भांडवल उपलब्ध व्हावे, यासाठी राज्य सरकार तब्बल २ हजार ५०० कोटी रुपयांची बँक हमी देणार आहे.महावितरणवर असलेली विद्यमान कर्जे, बँक दायित्वे आणि विविध कंपन्यांसोबत झालेले मूळ 'वीज खरेदी करार' महावितरणकडेच राहतील, ते नव्या कंपनीकडे जाणार नाहीत. मात्र, या करारांतर्गत मिळणाऱ्या विजेचा लाभ कृषी संस्थेला दिला जाईल. या योजनेत भविष्यात आवश्यकतेनुसार बदल करण्याचे सर्व अधिकार राज्य सरकारने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

**सरकारी आणि खासगी कंपन्यांमध्ये होणार झाडाझडती; महिलांच्या सुरक्षेसाठी 'पॉश' कायद्याची कठोर अंमलबजावणी**

## नाशिकमधील 'कॉर्पोरेट जिहाद'नंतर राज्य सरकार ॲक्शन मोडमध्ये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नाशिकमधील एका नामांकित कंपनीत उघडकीस आलेल्या 'कॉर्पोरेट जिहाद'चे तीव्र पडसाद उमटल्यानंतर, राज्यातील शासकीय, निमशासकीय आणि खासगी आस्थापनांमध्ये महिलांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी सरकारने धडक मोहीम हाती घेतली आहे. 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३' अर्थात 'पॉश' कायद्याची संपूर्ण राज्यात कठोर आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश महिला व बाल विकास विभागाने दिले आहेत. यासंदर्भात विभागाने एक परिपत्रक जारी केले असून, कंपन्यांची झाडाझडती घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना विशेषाधिकार देण्यात आले आहेत.



नाशिकच्या घटनेवरून धडा घेत, राज्य शासनाने अंतर्गत सुरक्षा यंत्रणा नसलेल्या कंपन्यांवर बडगा उगारण्याचे ठरवले आहे. नव्या आदेशानुसार, राज्यातील ज्या आस्थापनांमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्या सर्व ठिकाणी 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या समितीची रचना नावापुरती असू नये, म्हणून त्यात किमान ५० टक्के महिला सदस्य असणे, वरिष्ठ महिला कर्मचारीच अध्यक्ष असणे आणि बाह्य स्वयंसेवी संस्थेच्या (एनजीओ) प्रतिनिधीचा समावेश असणे अनिवार्य करण्यात आले आहे.

पीडित महिलांच्या तक्रारींची दखल घेण्यात टाळाटाळ करणाऱ्या कंपन्यांचे परवाने रद्द करण्याची तयारी सरकारने केली आहे. महिलांना आपल्या तक्रारी नोंदवण्यासाठी ई-मेल, लेखी अर्ज तसेच केंद्र सरकारचे 'शी-बॉक्स' पोर्टल यांसारखी विविध माध्यमे उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तक्रार प्राप्त झाल्यानंतर अवघ्या ७ दिवसांच्या आत कायदेशीर कार्यवाही सुरू करणे कंपन्यांना बंधनकारक असेल. संपूर्ण चौकशीदरम्यान गोपनीयता राखणे तसेच पीडित महिलेला मानसिक त्रास होणार नाही याची काळजी घेत आवश्यकतेनुसार अंतरिम दिलासा (सुटी किंवा विभाग बदल) देण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

**त्रुटी आढळल्यास फौजदारी कारवाई**

**नाशिकमधील 'कॉर्पोरेट जिहाद'च्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेला संताप पाहता, सरकारने अंमलबजावणीत कोणतीही कसर सोडलेली नाही. तपासणीदरम्यान ज्या कंपन्यांमध्ये किंवा कॉर्पोरेट कार्यालयांमध्ये त्रुटी आढळतील, किंवा अंतर्गत समिती कागदावरच असल्याचे सिद्ध होईल, अशा आस्थापनांवर 'पॉश ॲक्ट २०१३' च्या कलम २६ नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांचे व्यावसायिक परवाने रद्द करण्यासोबतच जबाबदार व्यवस्थापकांवर फौजदारी गुन्हेही दाखल केले जातील.**

**३१ मुद्द्यांची 'विशेष तपासणी सूची**

महिला व बाल विकास विभागाने कंपन्यांच्या तपासणीसाठी एक विशेष '३१ मुद्द्यांची तपासणी सूची' (चेकलिस्ट) तयार केली आहे. यामध्ये कंपनीचे अधिकृत पॉश धोरण, कर्मचाऱ्यांसाठी राबवले गेलेले जनजागृती कार्यक्रम, महिला कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, वार्षिक अहवाल वेळेत सादर केला की नाही, कार्यस्थळावरील सीसीटीव्ही आणि सुरक्षा व्यवस्था, तसेच 'शी-बॉक्स' पोर्टलवरील अधिकृत नोंदणी यांसारख्या ३१ कठोर निकषांवर प्रत्येक आस्थापनाची पडताळणी केली जाणार आहे. अधिकाऱ्यांचे विशेष पथक कोणत्याही क्षणी कंपन्यांमध्ये जाऊन ही तपासणी करू शकते.

# उच्च कोटीचे ध्येय पूर्ण करण्यासाठी समस्यांचे सुयोग्य निदान करून उपाययोजना केल्या पाहिजेत : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : : बुद्ध रूप प्रतिष्ठापनेनिमित्त धाराशिव जिल्ह्यातील हातोला येथील नालंदा बुद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला भीमसैनिक कोणत्या दिशेने चालला? या प्रासंगिक विषयावर बी. बी. मेश्राम यांच्या प्रबोधनात्मक व्याख्यानाचे १२ मे २०२६ ला आयोजन करण्यात आले होते.



फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम प्रबोधनात्मक मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपला समाज क्रमिक असमानतेवर आधारित जाती जातीत विभाजित असल्याने उच्च जातीतील माणसे इतरांकडे द्वेष, मत्सर भावनेने बघत असल्यामुळे परस्परांमध्ये बंधुभाव विकसित होत नाही. अर्थात जात वास्तव ही आपल्या देशाची प्रमुख समस्या आहे. हे लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मे १९१६ ला कोलंबिया विश्वविद्यालयात डॉ. ए. ए. गोल्डनवायझर यांच्या दालनात भारतातील जातीव्यवस्था : उगम, व्यवस्थापन आणि विकास असा प्रबंध सादर करून भारतातील जातीची समस्या जागतिक पटलावर मांडली होती. पुढील २० वर्षांनी त्यांनी जातीचे निर्मूलन हे पुस्तक लिहिले. तर त्या पुढील २० वर्षांनी जात निमूलनासाठी धर्मांतर करून बुद्ध धम्माचा स्वीकार केला. त्याची फलश्रुती म्हणून आपण आज बुद्ध रूपाची प्रतिष्ठापना केलेली आहे. याप्रसंगी आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९५६ ला म्हटल्याप्रमाणे माणसा माणसातील संबंध प्रेम करुणा या तत्त्वानुसार जोडणाऱ्या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत समता आहे. याची जाणीव ठेवून समतायुक्त समाज निर्माण करण्यासाठी आपण कटिबद्ध असले पाहिजे. हे साकार करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी हाती न घेता तलवार, बुद्ध राज्य करी जगावरीख त्यासी कारण एक, त्याचा प्रचार प्रभावशालीख असे ग्रामगीतेत नमूद केल्याप्रमाणे आपण बुद्धाच्या विचारांचा प्रभावीपणे प्रचार प्रसार केला पाहिजे.

पुढे बोलताना बी. बी. मेश्राम म्हणाले की, २० जुलै १९४२ ला नागपूर येथे संपन्न झालेल्या महिला अधिवेशनात बाबासाहेबांनी स्पष्ट केले होते की, मी त्या समाजाची प्रगती यावरून मोजतो की, त्या समाजात महिलांचा स्तर किती उंचावलेला आहे? याची जाणीव ठेवून महिलांनी आपला सहभाग नोंदविला पाहिजे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड सत्याग्रहात दिलेल्या संदेशाप्रमाणे उच्च कोटीचे ध्येय ठेवून आपल्या समाजाच्या सामाजिक समस्यांचे सुयोग्य रोग निदान करून समस्या निर्मूलनासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २८ नोव्हेंबर १९५४ ला स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांचे जीवन पहिले गुरु तथागत बुद्ध, दुसरे गुरु संत कबीर, तिसरे गुरु राष्ट्रपिता ज्योतिबा फुले व

### हातोला येथील नालंदा बुद्ध विहारात बुद्ध रूपाची प्रतिष्ठापना संपन्न

विद्या, स्वाभिमान व शील या तीन उपास्य दैवतामुळे बनलेले आहे. २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेप्रमाणे प्रत्येक बौद्धांनी दर रविवारी बुद्ध विहारात जाऊन चर्चेत सहभागी झाले पाहिजे तरच बुद्ध रूप प्रतिष्ठापनेला अर्थ प्राप्त होईल. करिता सर्व स्तरातील पुढारी अर्थात लोकप्रतिनिधीवर करडी नजर ठेवली पाहिजे, जेणेकरून त्यांना आपले कर्तव्य पार पाडण्यास सजग करून आपली कणखर भूमिका पार पाडली पाहिजे.

याप्रसंगी माताजी भिक्कूनी शासन तिस्सा यांच्या उपस्थितीत सकाळच्या सत्रात बुद्ध रूपासह रॅली काढण्यात आली. नंतर उपस्थितीत सर्व उपासकांना भिक्कूनी शासन तिस्सा यांनी धम्म देसना दिली. द्वितीय सत्रात प्रा. विलास कटारे म्हणाले की, विहारे ही चळवळीची संस्कार केंद्रे व्हायला हवीत. तसेच सुकाळे बाबूजी, एस. पी. हिवराळे, बाळू अहिरे यांनीही मार्गदर्शन केले.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून नालंदा बुद्ध विहाराच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. विहाराची संकल्पना रवींद्र अहिरे यांनी साकारली. भास्कर अहिरे, हिरामण अहिरे, श्रीमंत वाघमारे, रणजीत अहिरे, उद्धव अहिरे, भागवत अहिरे, अश्रूबा शिंदे, पोलीस निरीक्षक पारवे साहेब, रमेश अहिरे, संगीता पारवे, कौसल्या इजगज इत्यादी पंचक्रोशीतील शेकडो उपासक, उपासिका उपस्थित होते. द्वितीय सत्राचे सूत्रसंचलन हिरामण अहिरे, प्रास्ताविक रविंद्र अहिरे व आभार भास्कर अहिरे यांनी व्यक्त केले.

# गैरप्रकार करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यावर सेवा समाप्त करून गुन्हा दाखल करण्याची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दि. १५ मे २०२६ :- श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर मार्फत वयोवृद्ध, दिव्यांग तसेच गरोदर महिला भाविकांसाठी मंदिर परिसरात मोफत ई-रिक्षा सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर सेवेसाठी बीव्हीजी इंडिया लिमिटेड, पुणे यांच्या मार्फत कंत्राटी पद्धतीने वाहन चालक नियुक्त करण्यात आलेले आहेत.

यामधील श्री कुणाल राजेंद्र घोडके, पंढरपूर या कंत्राटी कर्मचाऱ्याने भाविकांकडून पैसे स्वीकारल्याचा प्रकार सीसीटीव्ही चित्रिकरणामध्ये आज दि. १५ मे, २०२६ रोजी रात्री ८.२५ वा. दरम्यान श्री संत नामदेव पायरी येथील मुखदर्शन रांगेच्या गेट क्रमांक १ येथे निदर्शनास आला आहे. मंदिर समितीमार्फत सदर ई-रिक्षा सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येत असताना संबंधित कर्मचाऱ्याने भाविकांकडून पैसे स्वीकारून गैरप्रकार केल्याचे स्पष्ट झाले आहे.

> **मंदिर समितीमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली ई-रिक्षा सेवा पूर्णपणे मोफत आहे. या सेवेसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. कोणत्याही व्यक्तीकडून शुल्काची मागणी करण्यात आल्यास भाविकांनी तात्काळ मंदिर समितीकडे तक्रार नोंदवावी. अशा प्रकारचा कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. मंदिर समिती अशा घटनांकडे गांभीर्याने पाहत असून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यास कटिबद्ध आहे.**
>
> **– राजेंद्र शेळके, कार्यकारी अधिकारी**

सदर प्रकार अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून संबंधित कर्मचाऱ्याची सेवा तात्काळ कायमस्वरूपी संपुष्टात आणण्याची तसेच त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच बीव्हीजी इंडिया लिमिटेड, पुणे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

# आषाढी यात्रेपूर्वी नवीन मंदिर समिती जाहीर होणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मुदत संपले असल्यामुळे नवीन मंदिरे समिती जाहीर होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. मंदार समितीमध्ये अध्यक्षपद व तीन-चार सदस्य पदे रिक्त आहेत. त्यामुळे यामध्ये समितीला धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार नाही. तसेच या मंदिर समितीची मुदत संपून तीन वर्ष झालेले आहेत. राजकीय वरदहस्त असल्यामुळे मंदिर समिती बरखास्त केली जात नाही. मंदिर समितीच्या विरोधात अनेक तक्रारी निर्माण झालेले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे श्रीकांत शिंदे यांनी मंदिर समिती बरखास्त करून नवीन मंदिर समिती नियुक्त करावी अशी मागणी केली आहे. त्यामुळे आषाढी यात्रे पूर्वी मंदिर समिती घोषणा होण्याची संकेत मिळत आहेत.

राज्यात महाविकास आघाडीचे शासन आहे. मंदिर समितीमध्ये शिवसेना शिंदे गट भाजप व राष्ट्रवादी अजित पवार गट या तीन पक्षाचे सदस्यांची वर्णी लागण्याची गरजेचे आहे. अनेक पदाधिकाऱ्यांनी मंदिर समितीवर आपली वर्णी लागावी यासाठी प्रयत्न सुरू केले असल्याचे दिसून येत आहे.



# इयत्ता दहावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी ता. शिरोळ येथील चर्मकार समाज मंदिर मध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, शाल देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी भविष्यातही मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उच्च शिक्षण घेऊन गावाचे, समाजाचे, नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. तसेच पालक व शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळाल्याचेही यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थी खालील प्रमाणे दिपाली अजित निर्मळे ९३.८०, यशस्वी सचिन निर्मळे ९१.४०, रत्नदीप रविंद्र निर्मळे ६७.८०, नीलम श्रीकांत निर्मळे ६१.६०, दिनेश राहुल निर्मळे ५८.८०, वेदांत गंगाधर माने ५७.००, दिगंबर भरत निर्मळे ४३.००, अन्नपूर्णा खोत, श्रावणी कुंभार, श्रावणी चिगरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ऑनरी कॅप्टन रमेश निर्मळे, माजी सैनिक भागोजी निर्मळे, संतोष निर्मळे यांनी केले.

# उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे मोफत सर्वरोग निदान शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्हा रुग्णालय नाशिक येथील कार्यरत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ सतीश शिंपी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ संदीप सूर्यवंशी व डॉ बाळू पाटील यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे सर्वरोग निदान शिबिराचे आयोजित करण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालय निफाड व डचइढ हॉस्पिटल धामणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरास



नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

शिबिराचे उद्घाटन रुग्णालय सहनियंत्रण व सल्लागार समिती सदस्य मधुकर शेलार, सागर कुंदे , दिलीप कापसे व सौ. सुवर्णा लुक्कड यांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांचे स्वागत वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजीव तांभाळे यांनी केले.या प्रसंगी

डचइढ हॉस्पिटल येथील डॉ. यश पाटील (बालरोग तज्ञ), डॉ. अजिंक्य पिंगळे (कान-नाक-घसा तज्ञ), डॉ. साईनाथ शिरोडकर (जनरल सर्जन) व डॉ. मयुर सूर्यवंशी उपस्थित होते.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजीव तांभाळे यांनी यावेळी प्रस्तावणेत उपक्रमामागील उद्देश स्पष्ट केले. तसेच डॉ. यश पाटील यांनी डचइढ हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या विविध आरोग्य सेवा व सुविधांबाबत उपस्थितांना माहिती दिली.


अध्यक्षीय भाषणात मधुकर शेलार यांनी डचइढ हॉस्पिटलच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांना मोठा लाभ होत असल्याचे सांगितले. तसेच उपस्थित सर्व रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समुपदेशक नितीन परदेशी यांनी केले तर कनिष्ठ लिपीक दिगंबर चेरापले यांनी आभार प्रदर्शन केले. सदरील सर्वरोग निदान शिबिरामध्ये एकूण २५७ रुग्णांनी विविध उपचार सेवा व आरोग्य सुविधांचा लाभ घेतला.

# पंढरपूर डाक विभाग व आयआयटी कॉम्प्युटर्स, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आधार अपडेट कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारतीय डाक विभागाच्या पंढरपूर डाक विभागाचे अधिक्षक श्री. मुन्ना कुमार सर यांचे संकल्पनेतून भारतीय डाक आणि आयआयटी कॉम्प्युटर्स, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या विशेष आधार कार्ड अपडेट कॅम्पला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कॅम्पमध्ये आधार कार्डातील नावातील दुरुस्ती, जन्मतारीख बदल, फिंगरप्रिंट अपडेट, फोटो अपडेट आदी महत्त्वाच्या सेवा विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. दिवसभरात तब्बल ४३ विद्यार्थ्यांनी या







सुविधेचा लाभ घेतला.

डाक विभागाचे आधार ऑपरेटर श्री.वसीम मुजावर यांनी दिवसभर विद्यार्थ्यांची आधार अपडेट प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडली. तसेच या कॅम्पला भारतीय डाक विभागाचे सहा. डाक अधीक्षक श्री.नागेश कंजेरी , विकास अधिकारी श्री. सोमनाथ कोरके, विपणन अधिकारी श्री. विष्णू कांदे यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली व उपक्रमाचे कौतुक केले.

हा आधार कॅम्प यशस्वी करण्यासाठी दत्ता कळकुंबे, रोहिणी मांजरे यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे संचालक नितीन आसबे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

विद्यार्थ्यांना आधुनिक व आवश्यक शासकीय सेवा सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयआयटी कॉम्प्युटर्स, पंढरपूर सातत्याने विविध उपक्रम राबवत असून या आधार कॅम्पमुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निमगाव(ह) येथील धरणाग्रस्तांच्या लढ्यास अखेर मिळाले यश: रश्मी बागल यांच्या हस्ते रक्कम रुपये ९ कोटी ६१ लाख रुपयांचा धनादेश तहसीलदार यांच्याकडे सुपूर्द



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा तालुक्यातील पूर्व भागातील निमगाव(ह) येथील धनगर ग्रस्त शेतकरी बांधव गेल्या २७/२८ वर्षापासू भूसंपादन झालेल्या शेत जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा म्हणून सतीश निळे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने संघर्ष करत होते, यास अखेर यश मिळाले असून हे काम मार्गी लावण्यासाठी भाजप महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष व जिल्हा परिषद गटनेच्या रश्मी दिदी बागल व भाजप युवा नेते दिग्विजय बागल यांनी धरणग्रस्त संघटनेचे अध्यक्ष सतीश शिंदे यांच्या सोबत घेऊन अनेक वेळा जिल्हाधिकारी सोलापूर पालकमंत्री जयकुमार गोरे जलसंपदा मंत्री कृष्णा खारे राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता तसेच शेतकऱ्यांच्या वतीने फायदेशीर लढा लढत असताना आणि सूर्यकांत सरडे यांनीही अत्यंत काळजीपूर्वक लक्ष घालून धरणग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी लाख मोलाची काम केले आहे याचाच पारंपारिक म्हणून आज ९ कोटी ६१ लाख ९१ हजार रुपये निधी मंजूर होऊन त्यांचा धनादेश उपविभागीय अधिकारी माढा कुर्डूवाडी यांचे प्रतिनिधी तथा तहसीलदार शिल्पा ठोकडे मॅडम यांच्याकडे सपोर्ट करण्यात आला यावेळी रेशमी दीदी बागल अँड सूर्यकांत सरडे तहसीलदार शिल्पा ठोकडे मॅडम यांचा शाल पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह देऊन विशेष सन्मान करून ऋण व्यक्त करण्यात आले याप्रसंगी श्री मकाई सहकारी साखर कारखाने चेअरमन दिनेश भांडवलकर संचालक राजाभाऊ हाके संचालक भाजपा मंडलाध्यक्ष सचिन पिसाळ नगरसेवक दीपक चव्हाण विजयराव लावंड धरणग्रस्त शेतकरी प्रकाश निळ आंबा ऋषी भिल धर्मराज जगताप लक्ष्मण रोकडे दत्ता साळुंखे धनंजय न्यू निमगाव चे माझे चेअरमन अतुल नीळ राजेंद्र भिल विष्णू निळ कालिदास निळ सोमनाथ जगदाळे हनुमंत आतकरे विकास रोकडे सुदाम साळुंखे इत्यादी धनगरस्थ शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निफाड तालुक्यात डिजिटल जनगणनेचा श्रीगणेशा: प्रगणक विचारणार ३३ प्रश्न, घरीच होणार नोंदणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जनगणनेचे काम करणारे प्रगणक तुमच्या घरी येतील. त्यांना कोणतीही कागदपत्रे किंवा ओटीपी देण्याची गरज नाही.नागरिकांनी फक्त विचारलेल्या प्रश्नांची खरी माहिती देणे आवश्यक आहे.

कालावधी: हा टप्पा १६ मे रोजी सुरू होऊन १४ जून २०२६* पर्यंत चालणार आहे.

या प्रक्रियेसाठी प्रशासनाने जय्यत तयारी केलीअसुन उपविभागीय अधिकारी डॉ शशिकांत मंगरुळे यांच्या मार्गदर्शनाखाली चार्ज अधिकारी म्हणून तहसिलदार विशाल नाईकवाडे व अतिरिक्त चार्ज अधिकारी म्हणून राहुल मुळीक कामकाज पाहत आहेत

एकूण ६३२ प्रगणक प्रत्यक्ष घराघरांमध्ये जाऊन माहिती गोळा करणार आहेत.

एकूण पर्यवेक्षक अचूक नियोजन आणि देखरेखीसाठी १०६ पर्यवेक्षक नियुक्त केले आहेत.

कामाचे विभाजन: निफाड तालुक्यात एकूण ६३२ भाग निश्चित करण्यात आले असून, एका भागात साधारणपणे १५० ते २०० घरांचा समावेश आहे.

१ मे ते १५ मे २०२६या १५ दिवसांच्या कालावधीत नागरिकांना मोबाईलवर स्वतः माहिती (स्वगणना) भरण्याची ऐच्छिक सुविधा देण्यात आली होती.

प्रगणकांकडून विचारले जाणारे ३३ प्रश्न

घरी येणारे प्रगणक डिजिटल स्वरूपात ३३ प्रश्नांची माहिती घेतील. त्यामध्ये खालील प्रमुख बाबींचा समावेश असेल:

- इमारत व घर क्रमांक, घराचे स्थान
- कुटुंबातील सदस्यांची एकूण संख्या आणि कुटुंब प्रमुखाचे नाव.
- लिंग व प्रवर्ग
- राहण्याच्या खोल्यांची संख्या आणि विवाहित जोडप्यांची माहिती.
- उपलब्ध सुविधा, मालमत्ता आणि साहित्य.

प्रशासकीय आवाहन आणि सुरक्ष सर्व माहिती गोपनीय व सुरक्षित ठेवली जाणार

– आयुष प्रसाद (जिल्हाधिकारी, नाशिक )

जिल्हाधिकार्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, जनगणनेच्या या पहिल्या टप्प्यात सक्रिय सहभाग घ्यावा. प्रगणकांना विचारलेली माहिती पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय ठेवली जाईल, त्यामुळे कोणतीही भीती न बाळगता खरी माहिती द्यावी.

## पंढरपूरमध्ये आजपासून डिजिटल जनगणनेस सुरुवात प्रगणकांना माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशांकानुसार पंढरपूर शहरात १ मे २०२६ पासून डिजिटल जनगणनेस प्रारंभ झाला असून प्रगनकना आपली वैयक्तिक माहिती देऊन सहकार्य करावे असे आव्हान मुख्याधिकारी यांनी केलेले आहे सदरील जनगणना ही पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबवली जात आहे. जनगणनेचा पहिला टप्पा सुगणनेचा पूर्ण झालेला असून दिनांक १६ मे ते १४ जून या कालावधीत दुसरा टप्पा या टप्प्याचे प्रत्यक्ष कामकाजास आज पासून सुरुवात झालेली आहे. या कामी श्री रमेश भोसले सहसंचालक जनगणना संचालनालय कार्यालय मुंबई यांनी प्रत्यक्ष भेट देऊन बोहरी पंपा येथील भागातील सुरू असलेल्या कामाची माहिती घेतली व त्या भागाचे प्रगन पर्यवेक्षक यांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय येथील सोलापूर येथील जनगणना अधिकारी व श्री महेश रोकडे मुख्याधिकारी हेही उपस्थित असून यांनी कामाची प्रत्यक्ष पाहणी केली या प्रगनकांना मार्गदर्शन केले या कामी प्रत्यक्ष जनगणनेचे कामकाज हे काम करण्याकरता पर्यवेक्षक २५ व १५० पर्यटकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या कामी प्रगणकाम घरी घरी करून माहिती संकलित करतील त्या अनुषंगाने श्री महेश रोकडे मुख्याधिकारी नगरपरिषद पंढरपूर यांनी जनगणनेच्या कामी नियुक्त प्रगनक घरी आल्यानंतर त्यांना वैयक्तिक माहिती देऊन सहकार्य करावे असेही आवाहन केले.

# निफाडला श्री शनेश्वर जयंती उत्साहात साजरी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरात सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्री शैनेश्वर जयंती उत्सव समिती व निफाड ग्रामस्थांच्या वतीने प.पू. रामप्रभुजी महाराज अंजनापुर व साधुसंतांच्या प्रमुख उपस्थितीत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून उत्साहात साजरी करण्यात आली

दिनांक १५/ ५ /२०२५ रोजी स.८ वा. ग्रामदैवतांना भक्तीभावाने निमंत्रित करण्यात येणार आहे , सायं. ६ वा.शनि भक्त प.पु. रामपूर जी महाराज प्रेरित श्रीक्षेत्र अंजनापुर ते श्रीक्षेत्र निफाड शनि भक्तांच्या पायी दिंडीचे स्वागत करण्यात आले, तर ८ वा. सद्गुरु गणेश महाराज भजनी मंडळाचे शनी चौकात भजनाचा कार्यक्रम झाला, दि. १६ रोजी स. ६ ते ७ श्री शैनेश्वर महाराज अभिषेक व महापूजा करण्यात आली असून ७ ते ८ सामुदायिक शनी महात्म्य पठण व श्री सत्यनारायण पूजा करण्यात आली, ८ ते १० नवग्रहां सह श्री शैनेश्वर महाराज याग- होम हवन तसेच ९ ते १० श्रींची टाळ मृदुंगाच्या व ढोल ताशांच्या गजरात भव्य ग्रामप्रदक्षणा करण्यात आली ,असून स. १० ते ११ या वेळेत श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी प.पूज्य श्रद्धेय शिवगिरी जी महाराज, प.पु.रामप्रभुजी महाराज, प.पू. गणेशगिरीजी महाराज,ह भ प विषृणु महाराज मिर्धे,ह भ प राजेंद्र महाराज थोरात, प.पू. नामदेवगिरी, आदी संतमहंतांचे पूजनाबरोबरच . सैनिक ,व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, यावेळी भंडारा डोंगर देहू, देवस्थान तर्फे प.पु. रामप्रभुजी महाराज यांना मंदीर प्रतिमा भेट देण्यात आली,दु.१२ ते ३ या वेळेत उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले रात्री ९ ते ११वेळेत कीर्तन झाले याप्रसंगी निफाड परिसरातील नागरिकांनी व शनी भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घेतला,

## शहरातील २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे होणार नियमित पात्र नागरिकांना अर्ज करण्याचे प्रांताधिकारी यांचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्य शासनाच्या निर्णयानुसार ०१ जानेवारी २०११ पूर्वी सरकारी जमिनीवर झालेली निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, पंढरपूर शहरातील पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह तातडीने अर्ज दाखल करावेत, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

महसूल व वनविभागाने २५ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयामुळे अनेक वर्षांपासून सरकारी जागेवर वास्तव्यास असलेल्या हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे त्यांच्या घरांना कायदेशीर मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासन निर्णयानुसार १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमित करण्यात येणार आहेत. ५०० चौरस फुटांपर्यंतचे अतिक्रमण विनामूल्य कायम करण्यात येणार असून, ५०० ते १५०० चौरस फुटांपर्यंतच्या अतिरिक्त क्षेत्रासाठी बाजारमूल्याच्या दहा टक्के शुल्क आकारले जाणार आहे.

शहरी भागातील नागरिकांनी पंढरपूर नगरपरिषद येथील मुख्याधिकाऱ्यांकडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.अर्जासोबत मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कर पावती, नगरपालिका हद्दीतील रहिवासाचे पुरावे सादर करणे आवश्यक राहणार आहे. तसेच महाराष्ट्रात एकच घर असल्याचे शपथपत्रही द्यावे लागणार आहे. अर्जाचा नमुना नगरपालिका नगररचना विभागात पाहायला मिळेल. शहरातील पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी मुख्याधिकारी नगरपरिषद पंढरपूर यांच्या संपर्क साधावा असे आवाहन प्रांत अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

**पक्षनिरीक्षक नागेश फाटे यांनी घेतल्या विविध इच्छुक पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती**

# उत्तर सोलापूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष देणार काम करणाऱ्यांना संधी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : उत्तर सोलापूर तालुक्यात नूतन पदाधिकारी निवडीबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध सेलच्या इच्छुक पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, ज्येष्ठ नेते आ.जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख तसेच कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांच्या आदेशानुसार पार पडल्या.

वडाळा येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयात पक्षाचे निरीक्षक नागेश फाटे यांनी इच्छुक पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या.

यावेळी पक्ष वाढीसाठी आणि पक्ष अधिक बळकट करण्यासाठी कोणते प्रयत्न करता येतील, याबाबत इच्छुक उमेदवारांची मते जाणून घेण्यात आली. पक्षाच्या माध्यमातून युवक, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचून संघटन विस्तार करण्यावर भर देण्यात आला.

उत्तर सोलापूर तालुक्यातील विविध भागांतून आलेल्या इच्छुक पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने मुलाखतीत सहभाग नोंदवला.

या मुलाखतीदरम्यान तालुकाध्यक्ष तुषार साठे, उद्योग व्यापार विभागाचे प्रदेश सदस्य विजय काळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुलाखतीसाठी शुभम पैकीकर, स्वप्निल कुंभार, दीपक क्षीरसागर, उमेश लोकरे, प्रतीक साठे, सुशांत देवकुळे, सागर मोहिते आणि ज्ञानेश्वर लोंढे यांनी आपली मते मांडत मुलाखती दिल्या.

उत्तर सोलापूर तालुक्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने या मुलाखतींना महत्त्व प्राप्त झाले असून आगामी काळात नव्या पदाधिकाऱ्यांची घोषणा होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत तालुक्यातील ११ हजार ७८७ ग्रामस्थांना विविध योजनांचा मिळाला थेट लाभ : तहसीलदार सचिन लंगुटे

## ७ मार्च ते १५ मे या कालावधीत घेण्यात आले शिबीर; पंढरपूर मंडळात ३ हजार २८८ तर नगरपालिकेमार्फत ६० दाखले, सेवांचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर महसूल विभागाशी संबंधित नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान दि.७ मार्च ते १५ मे या कालावधीत राबविण्यात आले. या अभियानातंर्गत तालुक्यातील ११ हजार ७८७ ग्रामस्थांना विविध योजनांचा थेट लाभ मिळाला असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.








दिनांक १५ मे रोजी पंढरपूर येथील श्रीयश पॅलेस येथे नगरपालिका स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या मंडळात ३ हजार २८८ तर नगरपालिकेमार्फत ६० विविध सेवा व दाखले देण्यात आले.

या अभियानातंर्गत पंढरपूर येथील शिबिरात निकाली काढण्यात आलेले फेरफार ५३६, सातबारा मधील दुरुस्ती १३, डिजिटल सातबारा ७६१, ८ अ उतारे ५४२, प्रमाणपत्रे १ हजार २२, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढण्यात आलेले अर्ज १३, अकृषक परवनगीचे दप्तर अद्यावत करणे-२, अद्यावत अभिलेख ०८, वर्ग दोन जमिन वर्ग एक करण्याबाबत कार्यवाही २, तुकडे बंदी काद्यानुसार खरेदी विक्रीचे व्यवहार नियमानुसार करुन देणे ४२,सामाजिक योजना५७, शिधापत्रिका १०१, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना ०५, आभा कार्ड एच.बी, तपासणी व औषधोपचार १७९, ई- मोजणी फेरफार नकाशा ०५ आदी सेवा व दाखले देण्यात आले.

तसेच नगरपालिकास्तरावर घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करुन देणे १३, प्रधानमंत्री आवास योजना बांधकाम परवाना प्रमाणपत्र वाटप १३, पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी १४, न.पा.क्षेत्रातील लाभार्थी जन्म मृत्यू दाखले १०, वाळू नोंदणी लाभार्थी १० अशा एकूण ६० लाभार्थ्यांना नगरपालिका प्रशासनाकडून लाभ देण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

यावेळी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणिती भालके, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, उपसभापती प्रमोद देशमुख, प्रांताधिकारी सचिन इथापे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे आदीसह मंडळाधिकारी, तलाठी, ग्रामस्थ तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

---

## महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यावर कठोर कारवाई करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अर्जुनी मोरगाव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांबद्दल बनावट फेसबुक आयडीद्वारे आक्षेपार्ह वक्तव्ये करून सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी आज दि.११ मे ला वंचित बहुजन आघाडी अर्जुनी मोरगाव व तालुक्यातील विविध आंबेडकरी संघटनांच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, आरोपीला कोणत्याही परिस्थितीत जामीन मिळू नये, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

### वंचित बहुजन आघाडीची तहसीलदारांकडे मागणी

**बनावट फेसबुक आयडीचा वापर** : मिळालेल्या माहितीनुसार, सडक अर्जुनी तालुक्यातील कोसमतोंडी येथील रहिवासी 'गौरेश बावनकर' याने 'दिनेश ब्राम्हणकर' या नावाने एक खोटी व बनावट फेसबुक आयडी तयार केली होती. या आयडीवरून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर महापुरुषांविषयी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन गलिच्छ व द्वेषपूर्ण लिखाण करण्यात आले. इतकेच नव्हे तर महापुरुषांच्या फोटोंचे विद्रूपीकरण करून ते सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आले.

**सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न** : या निवेदनात नमूद केल्यानुसार, आरोपीने जाणीवपूर्वक दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याच्या हेतूने हे कृत्य केले आहे. या प्रकारामुळे संपूर्ण आंबेडकरी समाज व बौद्ध बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या असून समाजात मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. डिजिटल युगात अशा प्रकारे ओळख लपवून महापुरुषांचा अवमान करणाऱ्या प्रवृत्तींना लगाम घालणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

**प्रमुख मागण्या** : तहसीलदार साहेबांना सादर केलेल्या निवेदनात खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत:

१.आरोपी गौरेश बावनकर याच्यावर तातडीने कठोर कलमान्वये गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी. २.अशा गंभीर गुन्ह्यातील आरोपीला कोणत्याही परिस्थितीत जामीन मंजूर करण्यात येऊ नये. ३.सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मजकूर तातडीने हटवण्यात यावा.

**विविध संघटनांचा पाठिंबा:** हे निवेदन देताना तालुका वंचित बहुजन आघाडी, वंचित बहुजन युवा आघाडी, वंचित बहुजन महिला आघाडी तसेच अर्जुनी मोर तालुक्यातील सर्व आंबेडकरी संघटना व बौद्ध समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनावर वंचित बहुजन आघाडी जिल्हा उपाध्यक्ष महादेव सलामे, तालुकाध्यक्ष किशोर तागडे, युवा संघटक लोमेश सांगोडे, आशिष कांबळे, कुलदिप खोब्रागडे प्रसिद्धी प्रमुख विश्वरत्न रामटेके, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन योग्य ती कारवाई न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

---

## राज्यातील माळी समाजातील नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : माळी विकास मिशन आयोजित माळी समाजातील राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील (पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका मधील )सर्व नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकारी यांचा सत्कार सोहळा व प्रबोधन शिबिर २०२६ चे उदघाटन ह.भ.प. सावता महाराज वसेकर, आमदार योगेश अण्णा टिळेकर यांचे हस्ते होणार आहे

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री नामदार श्री. जयकुमार गोरे,बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे यांचे शुभहस्ते हा सत्कार सोहळा पार पडणार आहे

यावेळी श्री. महेश झगडे (सेवानिवृत्त खड ),श्री. शेखर गायकवाड (सेवानिवृत्त खड ) यांचे मार्गदर्शन होणार आहे तर यावेळी खा. डॉ. अमोल कोल्हे, मा. आ. उमेश उर्फ चंदू यावलकर,आ. डॉ. प्रज्ञाताई सातव,मा. आ. कपिल पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत

### मंत्री ना.छगन भुजबळ, ना.जयकुमार गोरे, ना.अतुल सावे यांची उपस्थिती

रविवार दि.३१ मे २०२६ सकाळी १०:३० ते ५:३० सावित्रीबाई फुले सभागृह, गंज पेठ, पुणे.येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे

या कार्यक्रमास राज्यातील सर्व माळी समाजातील नगरसेवक, नगराध्य, उप नगराध्यक्ष, महापौर, उपमहापौर, जिल्हा परिषद सदस्य,सभापती, पंचायत समिती सदस्य व सभापती मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माळी विकास मिशनचे राज्य समन्वयक सर्वश्री संतोष भोजने शिक्षण प्रसार समिती (धाराशिव), सेवानिवृत्त ए सी पी सुरेश जाधव (सातारा मुंबई)के. आर. चौधरी, (मुंबई )अशोक भुजबळ (तळेगाव, पुणे), राजकीय समिती इंजि. वासुदेव चौधरी, आरोग्य समिती डॉ. श्रीकृष्ण ढोणे (ठाणे), स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समिती प्रा. अमृतराव काळोखे (सातारा, ) , रोजगार समिती राजेंद्र अहिरे (नाशिक), उद्योजक व कृषी समिती गोविंद डाके (लातूर, पुणे), दक्षता समिती ऍड मिलिंद घोडेकर (नारायणगाव, पुणे), युवा विभाग उमेश महाजन (जळगांव), प्रदेश प्रवक्ते विलास इंगळे (अकोला) , कला व संस्कृती समिती शरद वऱ्हेकर (अमरावती) नामदेव जाधव (धुळे),डॉ अरुणा माळी (कोल्हापूर),शीतल साखरे (गेवराई, बीड) यांनी केले आहे.

---

## बरुर कोर्सेगाव फाटा ते हत्तरसंग कुंडल रस्ता लवकरच दुरुस्त करावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरूर कोरसेगाव फाटा ते उत्तर संघ कुंडल रस्ता लवकर दुरुस्ती करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रसाद पाटील यांच्या सह हत्तर संघ कुंडल नागरिकांमधून मागणी होत आहे दक्षिण सोलापूर तालुक्यातील एक पर्यटन स्थळ म्हणून हत्तर संघ कुंडल या गावाकडे पाहिली जाते त्या ठिकाणी सोलापूर सह कर्नाटक अक्कलकोट तालुक्यातील पर्यटक भावी भक्त मोठ्या प्रमाणात देवदर्शनासाठी येत असतात रस्ता ना दुरुस्त असल्यामुळे नागरिकांना ग्रामस्थांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे रस्त्यावरची ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले असल्यामुळे वाहन चालवताना जो मुठीत धरून वाणी चालवावी लागतात अशी दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार सुभाष देशमुख यांनी तातडीने याकडे लक्ष घालून लवकरच लवकर पावसाळा सुरू होण्याची अगोदर रस्ता दुरुस्त करून जनतेला दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे.

### आमदार सुभाष बापू देशमुख यांनी पुढाकार घ्यावा

---

## शांततेकडून तणावाकडे; भूम शहरात पुन्हा संघर्षाची ठिणगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भुम प्रतिनिधी/प्रेम शिनगारे : भूम शहरात गेल्या तब्बल दोन महिन्यांपासून पुतळा उभारणीच्या मुद्द्यावरून दोन समाजांमध्ये मोठा संघर्ष सुरू होता. या विषयावरून शहरात अनेकदा तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. विविध संघटना, स्थानिक पदाधिकारी आणि नागरिकांकडून आंदोलन, निवेदने तसेच बैठका घेण्यात आल्या. काही वेळा वातावरण इतके तापले होते की कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. त्यामुळे प्रशासन आणि पोलिस यंत्रणा सतत सतर्क होती.

दरम्यान, वाढता तणाव लक्षात घेता प्रशासनाने पुढाकार घेत दोन्ही समाजातील प्रतिनिधींशी अनेक फेऱ्यांमध्ये चर्चा केली. अखेर संबंधित पुतळ्यासाठी स्वतंत्र जागा निश्चित करण्यात आली. त्यानंतर प्रशासनाच्या उपस्थितीत आणि पोलिस बंदोबस्तात पुतळ्याचे अनावरण पार पडले. या निर्णयानंतर शहरातील वातावरण शांत होईल आणि अनेक दिवसांपासून सुरू असलेला वाद मिटेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. अनेक नागरिकांनीही शांतता आणि सलोखा राखण्याचे आवाहन केले होते.

मात्र काल मध्यरात्री पुन्हा एकदा वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न झाल्याची घटना समोर आली. अज्ञात व्यक्तींनी संबंधित पुतळ्यावर दगडफेक केल्याची माहिती समोर येताच परिसरात खळबळ उडाली. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. काही भागात संतप्त प्रतिक्रिया उमटताना दिसून आल्या. सोशल मीडियावरही विविध प्रकारचे संदेश आणि चर्चा सुरू झाल्याने परिस्थिती अधिक संवेदनशील बनली.

याच दरम्यान भीमनगर परिसरात काही ठिकाणी दगडफेक आणि मारहाणीच्या घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. विशेषतः महिलांवर झालेल्या कथित मारहाणीमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेक नागरिकांनी पोलिसांकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिस प्रशासन तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. शहरातील संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून काही संशयितांची चौकशी सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून नागरिकांना शांतता राखण्याचे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. समाजात तेढ निर्माण करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपासून सावध राहावे, असेही पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. महापुरुषांच्या नावावरून समाजात संघर्ष निर्माण करण्याऐवजी त्यांच्या विचारांमधून एकता, बंधुता आणि शांततेचा संदेश घेण्याची गरज असल्याची भावना शहरातील अनेक सुज्ञ नागरिकांनी व्यक्त केली आहे.

भूम शहरातील ही परिस्थिती सध्या संपूर्ण जिल्ह्याच्या चर्चेचा विषय बनली असून पुढील काही दिवस प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. नागरिकांनी संयम राखून कायद्यावर विश्वास ठेवणे आवश्यक असल्याचे मत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

---

### पंचवीस हजार अधिक भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

# शनि जन्मोत्सव व अमावस्येनिमित्त गौडगावच्या मारुती मंदिरात भाविकांची अलोट गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री शनैश्वर जन्मोत्सव आणि शनि अमावस्येच्या दुर्मिळ मुहूर्तावर गौडगाव येथील श्री जागृत मारुती मंदिरामध्ये दर्शनासाठी भाविकांनी अलोट गर्दी केली होती. अनेक वर्षांनंतर आलेल्या या 'त्रिवेणी योगा'मुळे भाविकांमध्ये दर्शनासाठी मोठा उत्साह पाहायला मिळाला.अतिशय प्रसन्न आणि भक्तीमय वातावरणात भाविकांनी मारुतीरायाचे दर्शन घेतले.

या दुर्मिळ योगाचे औचित्य साधून मंदिर समितीच्या वतीने पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमांचे नेटके नियोजन करण्यात आले होते.पहाटे श्री मारुतीराया आणि शनिदेवांना जलाभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात आला.यानंतर मुख्य महारुद्राभिषेक पार पडला. तसेच नवग्रह शांती पूजा,शनि पूजा आणि गजलक्ष्मी पूजन अत्यंत श्रद्धेने करण्यात आले.



परिसराच्या व भाविकांच्या सुख-समृद्धीसाठी मंदिरात विशेष यज्ञ आणि होम-हवनही करण्यात आले.शेकडो भाविकांनी या विशेष पूजांमध्ये प्रत्यक्ष सहभाग नोंदवला, दुपारी ठीक १२ वाजता मंदिरात मारुतीरायाची व शनिदेवांची भव्य महाआरती करण्यात आली. दुपारच्या महाआरतीचा मान अक्कलकोट येथील आशोक चव्हाण यांना मिळाला.

यानंतर गुलाल उधळत अत्यंत उत्साहात शनि जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

दर्शनासाठी येणाऱ्या कोणत्याही भाविकाची गैरसोय होऊ नये, यासाठी 'गौडगाव मारुती अन्नछत्र मंडळा'च्या वतीने दिवसभर अखंड अन्नदान सेवा सुरू होती. दर्शनाला आलेल्या जवळपास पंचविस हजार अधिक भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ. हा महाप्रसाद मिथुन कलमानी आणि मित्र मंडळ (खजुर्गी) यांच्या वतीनेही शनि जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजन करण्यात आले होते. हा संपूर्ण उत्सव शांततेत आणि शिस्तीत पार पाडण्यासाठी मंदिर समितीने चोख व्यवस्था ठेवली होती.

समिती अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, सिद्राम वाघमोडे,ज्ञानेश्वर फुलारी बीरपा पुजारी परमेश्वर सुतार प्रकाश मेंथ भारत ननवरे प्रकाश सनकळ शांतया मठपती मल्लू म्हेत्रे श्रीमंत सवाळतोट श्रीमंत म्हेत्रे रमेश वाघे शरणाप्पा नाटेकर आमसिद्ध कोरे भीमना हडपद आदीसह उपस्थित होते .

**श्री जागृत मारुती मंदिरात शनि जन्मोत्सव व अमावस्येनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले.मिथुन कलमानी आणि मित्र मंडळ (खजुर्गी) यांच्या वतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच बसवेश्वर रक्तपेढी, सोलापूर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिरही पार पडले.दिवसभरात जवळपास २५ हजारांपेक्षा जास्त भाविक भक्तांनी दर्शनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेतला.**

**– सिद्राम वाघमोडे**
**(विश्वस्त, जागृत मारुती मंदिर, गौडगाव)**